**सरकारतर्फे साक्षीदार क्र.६ चा सरतपास –**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – अजय माधवराव पाटील,

वय – ३५ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणुक – कासारसिरसी पोलिस स्टेशन, ता.निलंगा, जि. लातूर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

मी सन सप्टेंबर २०२४ पासून कासारसिरसी पो.स्टे. येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत आहे. गुन्हा रजिस्टर नंबर ५८/२०२५ चा तपास प्रभारी पोलीस अधिकारी प्रविण राठोड यांनी माझ्याकडे दिला होता. सदरचा गुन्हा बी.एन.एस. कलम ३३१(४) आणि ३०५ अन्वये नोंद होता. तपास माझ्याकडे दिला तेव्हा तपास आदेश, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, साक्षीदार तपास टिप्पण, फिंगर प्रिंट यांचा अहवाल माझ्याकडे दिला होता.

२. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे आल्यानंतर माझ्या पुर्वी तपास अधिकाऱ्यांनी मुद्देमाल आणि आरोपीचा शोध घेण्याकामी दिलेल्या आदेशानुसार मी बीट जमादार यांच्याकडे चौकशी केली. रेकॉर्डवरील आरोपींच्या चौकशीकरीता पोलीस अधिक्षक यांच्याकडून परवानगी घेऊन उमरगा येथील सराईत आरोपींच्या घराची झडती घेतली होती. त्याचा झडती पंचनामा मी प्रस्तुत कामात दाखल केला आहे. तो झडती पंचनामा निल आला होता. आरोपी आणि मुद्देमाल याचा शोध लागत नसल्याने सदर केसमध्ये अ समरी आदेशाकरीता प्रस्तुत प्रकरण

न्यायालयात पाठवले होते.

३. स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी काही आरोपी ताब्यात घेतले होते. स्थानिक गुन्हे शाखा पोलीसांना त्या औरापीपैकी एकाने मदनसुरी येथील घरफोडी केल्याचे कबुल केले होते. सदर गुन्हयातील मुद्देमाल अहमदपुर पोलीस स्टेशनमध्ये जमा होता. तो मुद्देमाल अहमदपुर पोलीस स्टेशनला पत्र व्यवहार करुन ताब्यात घेतला. त्या मुद्देमालाचे अहमदपुर येथील सोने चांदीचे दुकानामध्ये जाऊन वजन केले. त्यामध्ये १०८ पैंजण जोड होते. त्याचे पाकीटासह वजन ४ किलो १०० ग्रॅम इतके होते. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या जप्ती पंचनाम्याची प्रत अहमदपुर पोलीस स्टेशनमधून घेतली. फिर्यादी आणि साक्षीदारांचा पुरवणी जबाब घेतला. इतर आरोपींचा शोध घेतला. परंतु आरोपी मिळाले नाहीत. तपासामध्ये आरोपीने त्याच्या साथीदारासह मदनसुरी येथील विश्वकर्मा ज्वेलर्स हे दुकान फोडुन त्या दुकानामधील चांदीच्या वस्तु चोरी केल्याचे निष्पन्न झाले म्हणून मी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. अहमदपुर पोलीस स्टेशन मधून मिळालेला मुद्देमाल दाखवल्यास मी ओळखु शकतो.(आता मला प्रस्तुत गुन्हयातील मुद्देमाल व्ही.एम.आर नं.२८/२०२६ मधील १०८ पैंजण जोड दाखवण्यात आले.) तो मुद्देमाल आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातील असुन तो अहमदपुर पोलीसांच्याकडे मिळालेला मुद्देमाल म्हणजे १०८ पैंजण जोड आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे अॅड. एच. व्ही. गायकवाड यांच्यामार्फेत शपथेवर सुरु–**

४. गुन्हयाचा तपास माझ्याकडे दि.२५/०९/२०२५ रोजी आला.

दि.०९/१२/२०२५ रोजी मुद्देमाल मी ताब्यात घेतला. त्याच दिवशी मी रोहीत ज्वेलर्स अहमदपुर यांच्याकडे जाऊन मुद्देमालाचे वजन केले होते. मी त्यावेळी पंचनामा केला नव्हता. मुद्देमाल ताब्यात घेतला तेव्हा तो मुद्देमाल सिलबंद नव्हता. अहमदपुर पोलीस स्टेशनचे राठोड नावाचे कर्मचाऱ्यांनी तो मुद्देमाल जप्त मुद्देमालातून काढून माझ्याकडे दिला. तो मुद्देमाल मी रोहित ज्वेलर्स यांच्याकडे मोजमाप केल्यानंतर ताब्यात घेतला. तो मुद्देमाल मला पोलीस स्टेशनमध्ये मिळाला. अहमदपुर पोलीसांनी मुद्देमाल माझ्याकडे देतेवेळी मला त्या मुद्देमालाच्या वजनाचे कागपत्र दाखवले नव्हते. दि.०९/१२/२०२५ रोजी वजन केल्याची पावती दोषारोपपत्रात दाखल नाही. वजन केल्यानंतर १०८ पैंजण जोड मी खपटी बॉक्समध्ये घेतले होते. त्या बॉक्सला सिल केले नव्हते. दि.१०/०१/२०२६ रोजी कासारसिरसी येथील अनिकेत ज्वलेर्स यांच्याकडे वजन करतांना तो मुद्देमाल बाहेर काढला होता. तो किती वाजता काढाला व ठेवला होता हे मला सांगता येत नाही. त्यावेळी पंचनामा केलेला नव्हता. निशाणी २५ वरील पंचनाम्यामध्ये चैन हा शब्द लिहलेला नाही. निशाणी २५ वरील सत्यप्रत करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव मला माहीत नाही. निशाणी २५ चा मुळ जप्ती पंचनामा पाहून मी खात्री केली नव्हती. फिर्यादमध्ये १०८ चैन जोड असा उल्लेख नाही. फिर्यादीने त्याच्या दुकानातील वस्तु कोठून खरेदी केल्या होत्या याचा तपास मी केला नव्हता. फिर्यादीकडे त्याच्या दुकानामध्ये किती वस्तु होत्या याची मी चौकशी केली होती. परंतु फिर्यादीने त्याच्याकडे स्टॉक रजिस्टर हजर केले नाही. फिर्यादीकडे चोरीला गेलेल्या वस्तुंच्या मालकी

बाबत किंवा ताब्याबाबत कोणताही पुरावा मला मिळुन आला नव्हता. चोरीला गेलेल्या वस्तुंच्या कंपनीचे नाव तपासात आढळून आले नव्हते. पैंजण सोडुन चोरीला गेलेल्या अन्य वस्तु कोणत्या वर्णनाच्या, वजनाच्या होत्या हे मला माहीत नाही. फिंगर प्रिंट तज्ञांचा अहवाल मिळालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या तपासामध्ये आरोपीने १०८ पैंजण जोड चोरी केल्याचे निष्पन्न झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेला तपास खोटा व चुकीचा होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**<u>सदर साक्षीदारचा जबाब आरोपीस व्ही.सी द्वारे हजर केल्यानंतर नोंदवण्यात आला. सदर जबाब नोंदवतेवेळी ऑडिओ व व्हीडीओ सुस्थितीत चालु होता.</u>**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.27 11:02:33 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२६/०२/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा